Impact Factor-8.632 (SJIF) ISSN 2278-9308

Issue No

(CDLXVI) 471

Volume-B

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**March 2024**

## Cooperative Sector in India: Opportunities and Challenges









**Chief Editor**

**Prof. Virag S. Gawande**

**Director**

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor – 8.632, ISSN – 2278-9308

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

## March -2024

ISSUE No - (CDLXVI ) 471 -B

# Cooperative Sector in India: Opportunities and Challenges

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308 March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin 431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani


| | | |
|---|---|---|
| 21 | भारतातील सहकारी शेती —फायदे –दोष प्रा. डॉ फाजगे अंगद के. | 87 |
| 22 | सहकार क्षेत्रामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेचे योगदान मोरे सपना गोविंद | 93 |
| 23 | सहकार क्षेत्रा पुढील आव्हाने व उपाय डॉ. जाधव विजु दत्तात्रय | 97 |
| 24 | सहकारी कृषी उद्योगातील नव उद्योजकता<br>प्रा. डॉ. भारत निर्वळ , रविंद्र भिकाजी भिसे | 103 |
| 25 | सहकार समृद्धी धोरणात संवादाची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास<br>डॉ. नामदेव सानप | 107 |
| 26 | महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध व्यवसायाची सद्यस्थिती :समस्या व उपाय<br>प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर | 117 |
| 27 | महाराष्ट्राच्या आर्थिक उभारणीत सहकाराचे योगदान प्रा.डॉ.बी.आर. शिंदे | 125 |
| 28 | सहकारी पतसंस्थासमोरील संधी आणि आव्हाने कोकरे हर्षकुमार विश्वनाथ | 128 |
| 29 | आर्थिक विकासात सहकाराची भूमिका - एक अभ्यास वर्षा सिताराम धुतमल | 132 |
| 30 | A Case Study of anImpact of E-Commerce In Supporting Small Businessesin India *Dr. Phole Kamal Bhaurao* | 136 |
| 31 | A Study of Maharashtra State Co-operative Bank: it's Problems and Remedies **Dr. Rajesh Murlidhar Jadhav** | 141 |
| 32 | A Study on customer attitude& awareness towards E-commerce shopping apps with special reference to rural youth **Dr.Adkine S.B., Rotte Sai Akash** | 144 |
| 33 | Study of Women's Participation In Activities of Co-operative Housing Societies With Reference to Thane City.<br>**Asst.Prof. CA Atul A. Raut, Dr. H. S. Patange** | 151 |
| 34 | A Study Of Non-Performing Assets And Its Impact On The Banking System In India **Suraj Digambar Bansode, Dr. B.T. Chavan** | 158 |
| 35 | Empowering Communities: Exploring Cooperative Entrepreneurship in India **Asst. Prof. Sushil Madanrao Gangane** | 161 |
| 36 | सहकारी तत्वावरील भारतीय दुग्ध पदार्थ निर्मिती : एक चिकित्सक अभ्यास<br>सुदर्शन मधुकर मलकापुरे | 169 |
| 37 | आप्पासाहेब खोतांच्या कथेतील सहकार चित्रण आणि हतबल शेतकरी<br>प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये | 173 |
| 38 | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व सुधारणा डॉ. कल्याण गोलेकर | 177 |
| 39 | महिला सक्षमीकरणात सहकाराची भूमिका डॉ सुनिता आत्माराम टेंगसे | 183 |
| 40 | Farmer Producer Companies in Latur District: A Study **Pavan V. Patil, Dr. Naresh V. Pinamkar** | 187 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308
March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व सुधारणा

डॉ. कल्याण गोलेकर

राज्यशास्त्र विभाग प्रमुख कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ. जि. परभणी.

प्रस्तावना

जागतिक पातळीवर सहकाराचा उगम औद्योगीक क्रांतीच्या प्रतिकूल परिणामातून झाला. इंग्लंडमधील रॉशडेल येथील विणकरांनी दारिद्रय व बेकारीवर मात करण्यासाठी सोसायटी ऑफ इक्विटेबल पायोनियर्स ही सहकारी संस्था सर्व प्रथम स्थापन करून आपली होणारी आर्थिक लूट थांबविली. तसेच जर्मनी येथे कृषी क्षेत्राला कर्ज पुरवठा करण्यासाठी रायफेझन सोसायटया स्थापन करण्यात आल्या याच धर्तीवर भारतातील शेतकऱ्यांची दारिद्रय, बेकारी व सावकारांच्या पाशातून मुक्तता करण्यासाठी कृषी क्षेत्राला कर्ज पुरवठा करण्यासाठी कृषी पतपुरवठा सहकारी सोसायटया स्थापन कराव्यात अशी शिफारस सर फ्रेडरिक निकोलसन यांच्या अहवालात करण्यात आली. यानुसार १९०४ मध्ये भारतात पहिला सहकारी पतसंस्था कायदा करण्यात आला. परंतु या कायद्याने केवळ कृषी पतसंस्था स्थापन करण्याची परवानगी होती, इतर प्रकारच्या संस्था स्थापन करता येत नव्हत्या. ग्रामीण जनतेला कृषी कर्ज पुरवठ्या बरोबर शेतमाल खरेदी-विक्री व्यवस्था, उपभोग्य वस्तूंचे वाटप करण्याच्या गरजेतून १९१२ मध्ये सहकारी सोसायटी कायदा १९१२ या नावाने कायदा करण्यात आला. यामुळे कृषी पतसोसायटया बरोबर इतर सर्व प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास परवानगी मिळाली. तसेच भारत सरकारच्या १९१९ च्या कायद्यानुसार 'सहकार' हा विषय राज्यसरकारांकडे हस्तांतरीत केला गेला. त्यावेळी मुंबई सरकारने सर्व प्रथम सहकारी कायदा पास करण्याचा देशात पहिला मान मिळविला. १९२५ मध्ये मुंबई सहकारी सोसायट्यांचा कायदा पास केला. यामध्ये पूढे अनेक सुधारणा करण्यात आल्या. १मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आल्यानंतर १९५८ सालच्या राष्ट्रीय विकास परिषदेच्या सहकार विषयक धोरणाशी सुसंगत असा अतिशय व्यापक स्वरुपाचा कायदा महाराष्ट्र सरकारने १९६० साली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० असा नवा कायदा करण्यात आला. यामध्ये १९७४, १९७५, १९७६, १९७७, १९७९, १९८२, १९८३ आणि आता २०१३ ची सुधारणा करण्यात आली. नवमहाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी ६०२१५ आहे. यामध्ये दरवर्षी वाढ झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील सन २०१३ ची सुधारणा :

जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण आणि खाजगीकरणामुळे १९९१ नंतर सहकार चळवळीसमोर अनेक आव्हाने उभी झाली. या पार्श्वभूमीवर सन २०१२ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि कै. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करतांना या वर्षाच्या निमित्ताने बदलाचे वातावरण सहकार क्षेत्रात सुरु झाले. देशातील आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळ स्पर्धेत टिकण्यासाठी ही चळवळ अधिक सक्षम, निकोप आणि व्यापक करण्यासाठी ९७ वी घटना दुरुस्ती करण्यात आली व त्याला अनुसरुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सन २०१३ ची सुधारणा करण्यात आली ती पूढील प्रमाणे :-

(१) सहकारी संस्थांच्या निवडणूकाबाबतची कार्यवाही: महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (क ब) अन्वये राज्यसहकारी निवडणूक प्राधिकरणाव्दारे यापुढे सर्व

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308
March 2024

सहकारी संस्थांच्या निवडणूका होतील व निवडणूकीस पात्र असलेल्या संस्थांनी प्रारुप मतदारयादी तयार करणे आवश्यक आहे. कायदा कलम २७ अन्वये ज्या व्यक्तिगत सभासदांना संस्थेत दोन वर्षेपूर्ण झालेली आहेत तसेच ज्या संस्था सभासदांची ३ वर्षे पूर्ण झालेली आहेत.

अशा सर्व सभासदांचा समावेश करावा लागेल. याबरोबर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या

बाबतीत मात्र सभासदत्वाच्या दिनांकापासून मतदार यादीत समावेश करावा लागेल.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

(२) उपविधी स्विकृती : मंजूर उपविधी व अधिनियमांतील सुधारणांनूसार संस्थांच्या निवडणूका पार पाडण्यात येतील. या दृष्टीने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण तसेच सर्व निबंधकांना योग्य ते सहकार्य करावे म्हणजे निर्धारीत कालावधीत संस्थेची निवडणूक पार पाडता येईल. अधिनियमांतील महत्त्वाच्या बदलासंबंधी खालील प्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

(३) संचालक मंडळ सदस्य संख्या:कायद्यातील नवीन बदलानुसार कलम ७३ (अअअ) नूसार सहकारी संस्थेवरील संचालक मंडळ सदस्य संख्येची कमाल मर्यादा २१ करण्यात आलेली आहे. याचाच अर्थ कोणत्याही सहकारी संस्थेचे संचालक मंडळावर २१ पेक्षा जास्त संचालक निवडून येणार नाहीत. संस्थेच्या उपरोक्त नमूद संचालकांशिवाय संस्थांच्या संचालक मंडळास २ तज्ज्ञ संचालक (Expert Director) तसेच एक किंवा दोन कार्यलक्षी संचालकांना (Functional Director) संचालक मंडळावर स्विकृत करून घेता येईल.

संस्थेने स्विकृत केलेला तज्ज्ञ संचालक हा संस्थेची उद्दिष्टये आणि कार्ये यांच्याशी संबंधित क्षेत्रातील जाणकार व्यक्ती असेल. जेव्हा संस्थेच्या समिती सदस्यांची संख्या १७ पेक्षा अधिक असेल तेव्हा संचालक मंडळ आणखी एका कार्यलक्षी संचालकाची स्विकृती करू

शकेल व हा संचालक कर्मचारी/ कर्मचारी संघटनेचा प्रतिनिधी असेल. स्विकृत करण्यात आलेल्या तज्ज्ञ संचालकांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही. मात्र संस्थेच्या समिती सभेच्या इतर सर्व विषयासंबंधी त्यांना मत देता येईल.

कार्यलक्षी संचालकांना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार असणार नाही. तसेच, समिती सभेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकी व्यतिरिक्त इतर विषयांवरील ठरावामध्येही त्यांना मत देता येणार नाही. मात्र समिती सभेत आलेल्या अशा ठरावासंबंधी सभेत ते आपले म्हणणे (Opinion) मांडू शकतील. तसेच, अशा ठरावासंबंधी अभिप्राय नोंदवू शकतील. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी विर्निर्दिष्ट केलेल्या आदर्श उपविधीमध्ये संचालक मंडळाची सदस्य संख्या, संस्थेचे एकूण व्यवहार व कामकाजाचे स्वरुप लक्षात घेऊन निश्चित करून दिलेली आहे.

(४) संस्थेच्या समितीवरील आरक्षित पदे सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समितीवर खालील प्रमाणे आरक्षित पदे राहतील.

(१) अनुसूचित जाती जमाती: (०१) पद

(२) विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग : (०१) पद गत

(३) इतर मागास वर्ग : (०१) पद

(४) महिला प्रतिनिधी : (०२) पदे

(५) क्रियाशील सभासद आणि अक्रियाशील सभासद :

कलम २ (अ-१) नूसार कायद्यातील क्रियाशील सभासदाची नव्याने केलेली तरतूद अत्यंत महत्त्वपूर्ण असून ज्या सभासदांनी मागील सलग पाच वर्षामध्ये किमान एक सर्वसाधारण सभेस हजेरी लावलेली आहे आणि ज्या सभासदाने

मागील सलग पाच वर्षात किमान एका वर्षी तरी संस्था पुरवित असलेल्या किमान सेवांचा लाभ घेतला असेल अशा सभासदांना क्रियाशील सभासद संबोधण्यात येईल. संस्थेच्या आदर्श उपविधीमध्ये किंवा आदर्श उपविधी विनिर्दिष्ट केलेले नसल्यास निबंधकाने मान्य केलेल्या उपविधीमध्ये या संबंधीचे स्पष्ट तरतूद असेल. जे सभासद, क्रियाशील सभासदांकरिता उपविधीमध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणार नाहीत अशा सभासदांचे संस्था अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण करेल व असे वर्गीकरण केल्यास आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीस दिवसांच्या आत अशा सभासदाला त्याची कल्पना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. संस्थेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा तसेच संस्थेच्या सर्वसाधारण सभेत कामकाजात सहभागी होऊन मतदान करण्याचा अधिकार केवळ क्रियाशील सभासदालाच आहे. तसेच संस्थेच्या सर्वसाधारण सभेस सभासदांची सर्वसाधारण सभेतील अनुपस्थिती क्षमापित (माफ) करण्याचा अधिकार असेल. अक्रियाशील सभासद संस्थेच्या निवडणुकीत मतदान करू शकणार नाहीत. मात्र अक्रियाशील सभासद सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकतील. सहकार कायद्यातील सन २०१३ च्या सुधारणेनंतर लगेचच होणाऱ्या संस्थेच्या निवडणूकीकरीता संस्थेचे सर्व सभासद क्रियाशिल गृहीत धरण्यात येतील.

अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण झाल्यापासून पुढील पाच वर्षात सभासद क्रियाशील न झाल्यास अशा सभासदाची हकालपट्टी कलम ३५ नुसार करता येईल. एखादा सभासद क्रियाशील अथवा अक्रियाशील असण्याचा वाद उद्भवल्यास असे वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत संबंधित सभासदाला निबंधकाकडे अपील करता येईल.

(६) संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा : कलम ७५ (अ) नुसार संस्थची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३० सप्टेंबर पर्यंत घेणे बंधनकारक करण्यात आलेले असून कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्याचे अधिकार शासनास नाहीत.

वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही विवरणपत्रे ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले असून त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे समिती सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यास किंवा कोणत्याही समिती सदस्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास दिलेल्या कर्जाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र तसेच आधीच्या लेखापरीक्षणाचा दुरुस्ती अहवाल व पुढील वर्षासाठीचा वार्षिक अर्थसंकल्प, लेखापरीक्षकाची नेमणूक करणे इ. अशी विवरणपत्रे वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे बंधनकारक आहे.

सहकारी संस्थेने किंवा तिच्या अधिकाऱ्याने किंवा सदस्याचे हेतूतः खोटे विवरणपत्र तयार केले किंवा कलम ७५ किंवा ७९ खाली (संस्थेच्या कार्याची माहिती, लेखापरीक्षण अहवाल, नफा वाटणी, उपविधी दुरुस्ती (असल्यास), वार्षीक सभेची/ निवडणुका (असल्यास) तारीख, निबंधकाने मागितलेली माहिती, लेखापरीक्षकाचे नाव व त्याचे संमती पत्र) विवरण देण्यात कसूर केली तर कसूरदार व्यक्तींना कलम १४६ व १४७ नूसार रूपये पाच हजार पर्यंत दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभा मुदतीमध्ये न घेतल्यास संस्थेच्या कर्मचाऱ्यास रुपये पाच हजार पर्यंत दंड होऊ शकतो आणि कसूर करणाऱ्या समितीस संचालकास पाच वर्षाहून कमी नसलेल्या काळासाठी संचालक पद धारण करण्यास अपात्र घोषित केले जाऊ शकते.

(७) संस्थेने निबंधकाकडे सादर करावयाची विवरणपत्रे : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये झालेल्या दुरुस्ती अन्वये कलम ७५ नुसार संस्थेने निबंधकाकडे आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत खालील विवरणपत्रे सादर करणे अनिवार्य करण्यात आलेले असून यात कसूर करणाऱ्या किंवा चुकीचे विवरणपत्र सादर करणाऱ्या कसूरदार अधिकारी/ समिती सदस्यास कलम १४६ व १४७ नुसार रुपये पाच हजार पर्यंत
२०१३ च्या सुधारणेनंतर लगेचच होणाऱ्या संस्थेच्या दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

ISSN : 2278-9308
March 2024

(१) संस्थेच्या कार्याची माहिती देणारे विवरणपत्र

(२) नफा वाटणी

(३) उपविधी दुरुस्ती (असल्यास)

(४) वार्षिक सभेची तारीख / निवडणूक तारीख (असल्यास)

(५) मागील आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

(६) मागील दोष दुरुस्ती अहवाल

(७) पुढील वर्षाचा अर्थसंकल्प

(८) निबंधकाने कायदा / नियम / उपविधीतील तरतूदीच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती.

(९) उपविधीत नमुद केलेल्या इतर व्यवहाराबाबत माहिती.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

सदर विवरणपत्रे संगणकाव्दारे ऑनलाईन भरावयाची आहेत.

(८) संस्थांचे लेखापरीक्षण: कलम ७५ (एक) (१) नुसार संस्थेने संस्थेच्या लेख्याचे वर्षातून एकदा लेखापरीक्षण करून घेणे अनिवार्य करण्यात आलेले असून चालू वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. नेमलेला लेखापरीक्षक हा शासनाने मान्य केलेल्या पॅनेलवरील असणे आवश्यक आहे.

संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यावर चार महिन्यांच्या आत लेखापरीक्षण पूर्ण होणे आवश्यक असून असे न केल्यास निबंधक अशा संस्थेचे लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करून ते पूर्ण करेल.

कलम २४ (अ) नुसार संस्थेच्या सर्वसाधारण सभेने संस्थेचे लेखापरीक्षण करण्या करीता नेमलेल्या लेखापरीक्षकास संस्थेचे जास्तीत जास्त सलग तीन वेळा लेखापरीक्षण करता येईल. तसेच सर्वसाधारण सभेत करावयाची लेखापरीक्षकाची नियुक्ती ही केवळ एकाच आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता असेल.

(९) सहकारी शिक्षण व प्रशिक्षण : संस्थेच्या प्रत्येक समिती सदस्यास (निवडून आलेल्या किवा स्विकृत केलेल्या) सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आलेले आहे. याचप्रमाणे प्रत्येक संस्था राज्यशासन विनिर्दिष्ट करील अशा राज्य संघीय किंवा राज्य प्रशिक्षण संस्थेमार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील अशी तरतूद कायद्यात नव्याने करण्यात आलेली आहे.

(१०) धकबाकीदार सभासदांना संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार नाही : कायद्याच्या कलम २७ (१०) मधील हा एक महत्त्वाचा बदल असून आता संस्थेच्या

थकवाकीदाराला संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार असणार नाही. म्हणजेच संस्थेच्या निवडणुकीमध्येही थकबाकीदार सभासद मतदान करू शकणार नाहीत. पूर्वी ही तरतूद केवळ कृषी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांनाच लागू होती. मात्र आता सर्वच प्रकारच्या सहकारी संस्थांना ती लागू करण्यात आलेली आहे.

(११) समितीत पोकळी निर्माण झाल्यास प्राधिकृत अधिकारी : कलम ७७ (अ) नुसार एखाद्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले किंवा व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाल्यास निबंधक एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी अथवा तीन सभासद सदस्याचे प्राधिकृत समिती नेमू शकेल. मात्र त्यांचा कालावधी सहा महिण्यापेक्षा जास्त असणार नाही.

(१२) कर्तव्यात कसूर किंवा निष्काळजीपणा करणाऱ्या समितीस काम करण्यापासून रोखून ठेवणे/बरखास्ती : कलम ७८ (अ) (१) अन्वये समितीने संस्थेच्या हितास बाधा

आणणारे कृत्य केल्यास निवडणुकीस कसूर केल्यास कार्य पार पाडण्यास नाकारले किंवा थांबवले, कामकाज ठप्प झाले, गंभीर वित्तीय नियमबाहय बाबी किंवा अफरातफरी उघडकीस आल्यास किंवा गणपूर्ती नसल्यास, निबंधक लेखी म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन समिती बरखास्त करून प्रशासक नेमू शकेल, अशा प्रशासक जास्तीत जास्त सहा महिने करीता नेमला जाऊ शकतो.

तथापि सहकारी बँकेच्या बाबतीत प्रशासक जास्तीत जास्त एक वर्ष कालावधीपर्यंत नेमता येईल. मात्र शासनाने संस्थेस रोख रक्कमेच्या स्वरुपात किंवा अन्य प्रकारे वित्तीय सहाय्य दिलेले नसेल किंवा शासनाने संस्थेचे भाग धारण केलेले नसतील किंवा संस्थेकरिता कोणतीही हमी दिली नसेल तर अशा संस्थांचे संचालक मंडळ निलंबित किंवा बरखास्त करण्याचा अधिकार निबंधकास असणार नाही.

(१३) इतर महत्त्वाचे बदल :

१. बिगर शेती कर्जाची दामदुप्पट मर्यादा रुपये ३०००/- वरून रुपये १००००/- करण्यात आली आहे (कलम ४४ अ).

२. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे देखभाल, सेवाशुल्क आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचे वैयक्तिक कर्ज वसुल करण्याकरिता कलम १०१ मध्ये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी नव्याने तरतूद

३. संस्थेच्या पथधिकाऱ्यांचा कालावधी निवडणुकीच्या दिनांका पासून ५ वर्ष. ४. अवसायकाने अवार्ड दिलेल्या दाव्यांमध्ये ५० टक्के रक्कमेचा भरणा केल्याशिवाय स्थगिती नाही.

५. अपीलामध्ये स्थगिती दिल्यास पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत दावा निकाली काढण्याची तरतूद कलम १५२ (२).

६. रिव्हीजन मध्ये अंतरिम आदेश दिल्यास पुढील सहा महिन्यांत अंतिम आदेश अथवा पूर्वीचाच आदेश अंतिम करण्याची तरतूद कलम १५४(३-अ).

७. कलम २ (१४अ) 'कार्यलक्षी संचालक' याचा अर्थ व्यवस्थापकीय संचालक किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी मग तो कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येवो असा आहे आणि त्यामध्ये, समितीने नामनिर्देशीत केलेल्या, संबंधीत संस्थेच्या कोणत्याही विभाग प्रमुखाचा, कर्मचाऱ्याचा किंवा मान्यताप्राप्त संघाच्या प्रतिनिधीचा समावेश होतो.

(१४) कलम २७ : व्यक्तिगत सभासदास मताधिकार सभासदत्व मंजूरीपासून २ वर्षानंतर असतो. त्यास अपवाद म्हणून 'सहकारी गृहनिर्माण संस्था' व 'सहकारी व्यापारी संकुल संस्था' सभासदांना सभासदत्व मंजूर होताच मताधिकार राहील.

(१५) कलम ७३ : ठराव संम्मत झाल्याच्या दिनांका पासून १५ दिवसांत ठरावाच्या प्रतिकूल मत कळविण्याची तरतूद केली आहे.

(१६) कलम ७३ (अअअ) शासन भाग भांडवल प्राप्त संस्थेत दोन शासकीय अधिकारी यांचा संचालक मंडळात समावेश राहील. त्यांना संस्था निवडणुकीत मताधिकार राहणार नाही. अन्य बाबतीत मताधिकार राहील.

(१७) कलम ८१ : वित्तीय वर्ष संपल्यापासून ४ महिन्यामध्ये लेखापरीक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. लेखापरिक्षकाचा अनुभव पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.सी.ए.-१ वर्ष, सी.ए. फर्म- निरंक व प्रमाणित लेखापरिक्षक-३ वर्ष.

(१८) कलम ७२ : नूसार समितीने निबंधकाला व अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे बंधनकारक केले आहे. कसूर करणाऱ्यास कलम १४६ (ल) अंतर्गत अपराध मानून कलम १४७ (ल) अंतर्गत हया अपराधासाठी रुपये एक हजार पर्यंत दंडात्मक तरतूद आहे.

(१९) लेखापरिक्षण मानकांनुसार : लेखापरिक्षण हे लेखापरिक्षण मानकांनुसार करणे बाबत सुधारणा केली आहे.

(२०) इ. सहकार : इ. सहकार अंतर्गत संस्थाची संगणकीय माहिती नोंदणी (enrollment) करणे, विविध विवरणपत्रे भरणे, सहकारी गृहनिर्माण संस्थेने जमीनीचे मानीव हस्तांतरण करणेसाठी अर्ज करणे इत्यादीसाठी सोय उपलब्ध करून दिली आहे. त्याचा सहकारी संस्थांना फायदा होणार असून त्याचे संकेतस्थळ mahasahakar maharashtra.gov.in असे आहे.

*निष्कर्ष :*

महाराष्ट्रातील सहकारी संस्था कायदा १९६० आणि सन २०१३ मधील सुधारणे मुळे महाराष्ट्रातील सहकार चळवळीला गती मिळेल. कारण यामुळे सहकारातील गैरप्रकारांना आळा बसेल. परंतु हे तेंव्हाच शक्य होईल जेव्हा सहकार क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप कमी होईल. तसेच तोट्यातील संस्थांचे चांगल्या संस्थेमध्ये विलीनीकरण करणे, संस्थेच्या नुकसानीस व्यवस्थापक मंडळास जबाबदार धरणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा कार्यप्रणालीत वापर केला तरच सहकार क्षेत्र सामान्य व्यक्तीच्या विश्वासास पात्र ठरून 'विना सहकार नही उध्दार' या ब्रीद वाक्याने सुरु झालेल्या सहकार चळवळीच्या समृध्दीचा नवीन अध्याय सुरु होईल.

*संदर्भग्रंथ सूची :*

(१) सहकार तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन : डॉ. गो.स. कामत
(२) सहकाराची मुलतत्वे : व्ही.टी. चौगुले, के.जी. पठाण
(३) लोकराज्य : 2022
(४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल :
(5)www.sahakarayukta.maharashtra.gov.in
(६) सभासद माहिती पुस्तिका : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani
PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani